**स्थायी निदेश क्र. ११-२०२३**

**नगरपरिषद / नगरपंचायतीमधील स्थानिक कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी व वेतन निश्चितीची पडताळणी कार्यपद्धती निश्चित करणेबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत,**
**७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४००६१४**
**क्रमांक नपप्रसं/प्र.क्र.१५/२०२३/स्थायी नि./११/२०२३/न.प.स्था.कर्म./सेवावि.बाबी/ वेतन नि.पड. कार्य./कक्ष-१२/७००३,**
**दिनांक :- १५ मार्च, २०२३.**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक स्वायत्तता देण्यात आलेली असून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडील कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन, अंशदाने व निवृत्ती वेतन विषयक लाभांच्या दायित्वांची जबाबदारी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर असल्याने वेतन व निवृत्तीवेतन विषयक खर्चाचा भार नगरपरिषद स्वनिधीवर पडतो. नगरपालिका, नगरपरिषदा यांना, जकात व स्थानिक संस्था करापोटी दिल्या जाणाऱ्या "सहाय्यक अनुदानातून" खर्च उद्दिष्टाच्या प्राधान्य क्रमानुसार, वेतन, निवृत्ती वेतनावर खर्च केला जातो व त्यानंतर उर्वरित रक्कम विकास कामांसाठी वापरली जाते. नव्याने निर्माण होणाऱ्या नगरपरिषदा व नगरपंचायती यांना मंजूर आकृतीबंधानुसार वेतनावर होणारा खर्च विचारात घेऊन शासनाकडून सहायक अनुदान निश्चित केले जाते. नगरपरिषदा / नगरपंचायती या घटनात्मक स्थानिक स्वराज्य संस्था असून त्यांचा स्वनिधी व शासकीय अनुदाने यांचा त्यामुळे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून सुयोग्य वापर होणे आवश्यक आहे.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय व त्यांच्या अधिनस्त असलेले विभागस्तरावरील व जिल्हास्तरावरील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची शासन निर्णय वित्त विभाग दि. २२ डिसेंबर, १९८९ नुसार संचालक, लेखा व कोषागारे यांच्या आस्थापनेवर मुंबई, पुणे, नागपुर व औरंगाबाद या ठिकाणी प्रत्येकी एक "वेतन पडताळणी पथका" ची निर्मिती करण्यात आलेल्या पथकांकडून वेतन निश्चितीची पडताळणी केली जाते. तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी राज्यसेवा संवर्गातील राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या जिल्हास्तरावरील संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा वेतन पडताळणी पथकाकडून राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार निर्गमित झालेल्या अधिसूचनांप्रमाणे वेतन निश्चितीची पडताळणी केली जाते. वेतन पडताळणी पथकाचे काम हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके, संबंधित विभागांची परिपत्रके व महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील नियमानुसार करण्यात येते.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील त्यांच्या आस्थापनेवर मंजूर कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीची पडताळणी करण्याकरिता सक्षम धोरण व यंत्रणा सद्यस्थितीत अस्तित्वात नाही. परिणामी, स्थानिक निधी

लेखापरीक्षण कार्यालयाकडील वार्षिक संवैधानिक लेखापरिक्षणाअंती अनेक त्रुटी व वसुलपात्र रकमा आक्षेपित केल्या जातात. पर्यायाने वसुलपात्र रकमांच्या स्वरुपात मोठ्या प्रमाणात निधी गुंतून राहतो व वसुलीअंती निधी उपलब्ध होतो. वसुलपात्र रकमेमुळे निवृत्ती वेतन प्रकरणे प्रलंबित राहतात. अनेक वेळा सदोष सेवानिवृत्ती लाभाची निश्चिती केली जाते. त्यामुळे मा. न्यायालायीन प्रकरणे, मा. लोकायुक्त प्रकरणे उद्‌भवतात. पर्यायाने प्रकरणांवरील न्यायिक कार्यवाहीवर मोठ्या प्रमाणात स्वनिधी खर्च होतो. सार्वजनिक निधीचा अपव्यय टाळणे व त्यासाठी योग्य प्रशासकीय व्यवस्था निर्माण करणे त्यामुळे आवश्यक झाले आहे.

**आदेश :-**

**१.** नगरपरिषदा / नगरपंचायती येथे कार्यरत राज्य शासकीय अधिकरी व राज्य संवर्गातील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीकरिता, विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालयांतर्गत मंजूर पदावर कार्यरत असणारे लेखापाल/लेखापरीक्षक, श्रेणी-अ / सहाय्यक आयुक्त (लेखा), लेखाविभागातील अधिकारी यांना त्या-त्या महसुली विभागा अंतर्गतच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चिती पडताळणीचे निर्देश देण्यात येत आहेत. ते यापुढे "सक्षम वेतन पडताळणी यंत्रणा" म्हणून वेतन पडताळणीचे कामकाज तात्काळ सुरु करतील.

**२.** विभागीय सह आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्त असणारे सहाय्यक आयुक्त (लेखा) / लेखापाल/लेखापरीक्षक, श्रेणी-अ, लेखा विभागातील अधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र नागरी सेवा (से.नि.वे) नियम १९८२ मधील नियम १२१ ते १२६ नुसार व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक व विविध वेतन आयोगानुसार निश्चित व मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांची वेतन निश्चितीची पडताळणी करून त्यांच्या शिफारशीनुसार परिशिष्ट-१ प्रमाणे प्रमाणपत्र द्यावे.

**३.** नगरपरिषद / नगरपंचायत व विभागीय सह आयुक्त यांनी नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे क्रमप्राप्त राहील.

**१)** मुख्याधिकारी हे प्रथम शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक व वेतन पडताळणी मार्गदर्शिका या अन्वये कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके सेवानिवृत्तीच्या किमान एक वर्ष अगोदर पर्यंत अद्यावत व परिपूर्ण करतील.

**२)** मुख्याधिकारी हे कर्मचाऱ्यांचे अद्यावत सेवापुस्तक, सेवानिवृत्तीस एक वर्ष शिल्लक राहिले असताना विभागीय सह आयुक्त कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय येथे पडताळणीकरिता सादर करतील.

**३)** विभागीय सह आयुक्त कार्यालयात सेवापुस्तके सादर केल्यावर, लेखा विभागातील अधिकारी/कर्मचारी हे पुढीलप्रमाणे प्राप्त लाभांचे व वेतन निश्चितीची पडताळणी करतील.

- थेट नियुक्तीने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रारंभिक मूळ वेतनाची पडताळणी
- पदोन्नतीने प्राप्त होणाऱ्या पदाची वेतननिश्चिती
- कालबद्ध, आश्वासित प्रगती योजना व सुधारित आश्वासित प्रगती योजनेंतर्गत प्राप्त लाभ व वेतन निश्चिती
- मर्यादित विभागीय परीक्षेच्या निवडीने होणारी वेतन निश्चिती

- वेतन पडताळणी मार्गदर्शिकेतील सर्व मुद्दे.

४. वेतन निश्चिती प्रकरणांची पडताळणी करताना काही त्रुटी, उणीवा, अपूर्णता आढळल्यास आक्षेप उपस्थित करतील. सदर आक्षेपांची पूर्तता करण्यासाठी वेतन पडताळणी करणारे अधिकारी, सदरचे सेवापुस्तक संबंधित नगरपरिषद / नगरपंचायतीस परत पाठवतील किंवा आवश्यक असल्यास संबंधित नगरपालिकेकडून तात्काळ आक्षेपांची पूर्तता करून घेतील. (संबंधित मुख्याधिकारी यांनी आक्षेपांची पूर्तता करून १५ दिवसांमध्ये सेवापुस्तक जमा करणे बंधनकारक राहील.)

५. प्रत्यक्ष सेवापुस्तक प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसामध्ये सदरच्या सेवापुस्तकाची पडताळणी करून विभागीय सह आयुक्त हे परिशिष्ट-१ मध्ये प्रमाणपत्र निर्गमित करतील किंवा आक्षेपांची पूर्तता करण्यासाठी सदरचे सेवापुस्तक संबंधित नगरपालिकेस परत करतील.

६. विभागीय सह आयुक्त हे कार्यालयामध्ये "वेतन पडताळणी कक्ष" या स्वतंत्र कार्यासनाची स्थापना करेल व वेतन पडताळणी कक्षाकरिता स्वतंत्ररित्या विभागातील "अ" व "ब" नगरपरिषदांमधील लेखापरीक्षण व लेखा सेवा किंवा कर व प्रशासकीय सेवा या संवर्गातील २ कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात उसनवारी तत्वावर तात्काळ सेवा वर्ग करतील.

७. संचालनालय स्तरावरील ई गव्हर्नन्स कक्षाकडून वेतन पडताळणी पथक, मुंबई यांचेकरिता सेवापुस्तक पडताळणीसाठी अस्तित्वात असलेली संगणक प्रणालीच्या धर्तीवर स्वतंत्र "नगरपरिषद / नगरपंचायत कर्मचारी सेवापुस्तक पडताळणी प्रणाली" संगणक प्रणाली लवकरात लवकर विकसित करावी. भविष्यात याच संगणक प्रणालीच्या माध्यमातून संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक पडताळणीकरिता प्रथम ऑनलाईन पद्धतीने विभागीय सह आयुक्त यांना सादर करतील व तद्नंतर ३ दिवसांमध्ये परिपूर्ण प्रस्ताव मूळ सेवा पुस्तकासह विभागीय सह आयुक्त कार्यालय यांना सादर करतील.

८. संबंधित नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे विभागीय सह आयुक्त यांचे परिशिष्ट-१ मधील पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्याखेरीज निवृत्तीवेतन, उपदान व रजा रोखीकरण अदा करणार नाहीत. मुख्याधिकारी यांना सेवानिवृत्ती वेतन प्रकरण मंजूर करण्याकरिता विभागीय सह आयुक्त यांचे पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य राहील.

९. विभागीय सह आयुक्त यांच्या पडताळणी प्रमाणपत्राविना निवृत्तीवेतन प्रकरण मंजूर केल्यास संबंधित नगरपालिकेचे मुख्याधिकारी व आस्थापना प्रमुख हे शिस्तभंग विषयक कार्यवाहीसाठी पात्र असतील.

१०. सदरचा स्थायी निदेश हा दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजी अथवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू राहील.

**-स्वा-**
**(मनोज रानडे-भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.**

**प्रति,**

१. विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

२. जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व ).
३. अध्यक्ष / प्रशासक, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
४. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१. मा. प्रधान सचिव ( २ ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. विभागीय आयुक्त , नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय ( सर्व ).
३. संचालक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४. सह संचालक, स्थानिक निधी लेखा, सर्व विभाग.
५. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई ( सर्व कार्यासन ).
६. निवड नस्ती.

# **परिशिष्ट-१**

विभागीय सह आयुक्त,....... यांचे कार्यालय

**“वेतन पडताळणी कक्ष"**

**सेवा विषयक बाबी व वेतन निश्चिती पडताळणी प्रमाणपत्र**

**१.** नगरपरिषद / नगरपंचायतीचे नाव

**२.** कर्मचाऱ्याचे नाव

**३.** नियुक्ती पदनाम व दिनांक

**४.** नियुक्तीची वेतनश्रेणी

**५.** सुधारित वेतन आयोगाची प्रारंभिक वेतननिश्चिती / पदोन्नतीने / सुधारित आश्वासित प्रगती योजना अंतर्गत / एकाकी पदाचा लाभ दिला असल्यास वेतनश्रेणी व दिनांक .....रोजी निश्चित केलेले मूळ वेतन. (सर्व आयोगांची व लाभांची )

**६.** सेवानिवृत्ती पूर्वी प्राप्त होणारी अखेरची वेतनवाढ दिनांक व मूळ वेतन

वरीलप्रमाणे सुधारित वेतन आयोगाची प्रारंभिक वेतननिश्चिती व लाभांची वेतननिश्चिती पडताळली व ती बरोबर आढळून आली आहे.

(अधिकारी यांचे नाव)
विभागीय सह आयुक्त
विभागीय आयुक्त कार्यालय,.........

**<u>स्थायी निदेश- ११-२०२३ (शुद्धीपत्रक )</u>**

**नगरपरिषद / नगरपंचायती मधील स्थानिक कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबी व वेतन निश्चितीची पडताळणी कार्यपद्धती निश्चित करणेबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१**
**क्र.नपप्रसं/स्थायी नि./११/२०२३/न.प.स्था.कर्म./सेवावि.बाबी/वेतन नि.पड. कार्य./**
**कक्ष-१२/२८४६**
**दिनांक २६ मार्च, २०२५**

---

**वाचा:- क्र. संचालनालयाचे क्र.नपप्रसं/स्थायी नि./११/२०२३/न.प.स्था.कर्म./सेवावि.बाबी/वेतन नि.पड. कार्य./कक्ष-१२/७००३ दि.१५.१२.२०२३**

**प्रस्तावना-:**

वाचा क्र.१ दिनांक १५.१२.२०२३ अन्वये नगरपरिषदा / नगरपंचायती येथे कार्यरत राज्य शासकीय अधिकारी /कर्मचारी व राज्यस्तरीय संवर्गातील कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीकरिता विभागीय आयुक्त कार्यालयांस मार्गदर्शन सूचना देण्यात आल्या आहेत.

तथापि, संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही प्रशासकीय कारणास्तव नगरपरिषद /नगरपंचायत आस्थापनेवरील नगरपरिषद सेवानिवृत्त कर्मचारी यांची वेतन पडताळणी होण्यास विलंब होत आहे. याकरिता, नगरपरिषद /नगरपंचायत आस्थापनेवरील सेवानिवृत्त कर्मचारी यांची वेतन पडताळणी जलद गतीने / सुरळीत होण्याकरिता विभागीयस्तर व जिल्हास्तरावरून कार्यवाही करणेबाबत सूचना देण्याचे विचाराधीन होते. या स्थायी निदेश सूचना देण्यात येत आहेत.

**आदेश :-**

१.वाचा क्र.१,दिनांक १५.१२.२०२३ अन्वये राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीकरिता दिलेल्या सूचना जशास तशा लागू राहतील.

२. वाचा क्र.१,दिनांक १५.१२.२०२३ मध्ये वर्ग -३ व वर्ग-४ कर्मचा-यासंदर्भात खालीलप्रमाणे बद्दल करून या शुद्धीपत्रकाद्वारे सुधारित निदेश देणेत येत आहेत.

**अ)** सदर सूचनानुसार विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व )/ जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व ) मध्ये मंजूर पदावर कार्यरत असणारे

लेखापाल /लेखापरीक्षक, श्रेणी-अ / सहाय्यक आयुक्त (लेखा), लेखाविभागातील अधिकारी यांना त्या त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चिती पडताळणीचे निर्देश देण्यात येत

आहे. ते यापुढे "सक्षम वेतन पडताळणी यंत्रणा" म्हणून वेतन पडताळणीचे कामकाज तात्काळ सुरु करतील.

**ब)** सदरची कार्यवाही जलदगतीने / सुरळीत होण्याकरीता , तसेच सेवानिवृत्ती कर्मचारी याचे सेवाविषयक बाबींसंदर्भात प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार **विभागस्तर व जिल्हा स्तरावरील** कार्यालयांनी नगरपरिषदेच्या सर्व नगरपरिषद/नगरपंचायतमधील सेवानिवृत्त / कार्यरत कर्मचारी यांचे वेतन पडताळणी /सेवापुस्तक पडताळणीचे कामकाज **वाचा क्र.१,दिनांक १५.१२.२०२३ मधील सूचनानुसार करावे.**

| **अ.क्र.** | **कार्यालयाचे नाव** | **संवर्ग** | **संबधित कामकाज पार पाडणारे अधिकारी वर्ग** |
|---|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) | वर्ग -३ | विभागीय सह आयुक्त व संबंधित लेखापाल /लेखापरीक्षक , श्रेणी अ |
| २. | जिल्हा सह आयुक्त , जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व ) | वर्ग -४ | जिल्हा सह आयुक्त व संबंधित लेखापाल /लेखापरीक्षक , श्रेणी अ |

-स्वा-

**(मनोज रानडे-भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई**

**प्रति,**

१. विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२. जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व ).
३. अध्यक्ष / प्रशासक, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
४. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

**१.** मा. प्रधान सचिव ( २ ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. विभागीय आयुक्त , नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
३.संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४.सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, सर्व विभाग.
५. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई ( सर्व कार्यासन ).
६.निवड नस्ती.

**महाराष्ट्र शासन**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
नवी मुंबई महानगरपालिका इमारत, ७ वा मजला,बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
E mail ID : mcemp.dma@gmail.com

---

क्र.नपप्रसं /शिक्षक-शिक्षकेत्तर / प्राथ- /वेतन पडताळणी /

प्रती,

१. मा.विभागीय सह आयुक्त
नगर परिषद प्रशासन विभाग,
विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व )

२. जिल्हा सह आयुक्त
नगर परिषद प्रशासन शाखा
जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व )

विषय - नगरपरिषद /नगरपंचायत संचलित प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्ती कर्मचारी यांची वेतन पडताळणी करणेबाबत.

संदर्भ - १. विभागीय आयुक्त कार्यालय , नागपूर यांचे पत्र क्र.एमयुएन/१९/१/१/शिक्षक /कवि- ३८ /२०२५ दि.३१.०१.२०२५
२. संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.११-२०२३ दि.१५.१२.२०२३
३. संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.११-२०२५ दि.२६.०३.२०२५ (शुद्धीपत्रक )

वरील विषयाच्या संदर्भ क्र.०१ येथील पत्रान्वये विभागीय आयुक्त कार्यालय , नागपूर यांनी नगरपरिषद /नगरपंचायत संचलित प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्ती कर्मचारी यांची वेतन पडताळणी करणेबाबत मार्गदर्शन मागणी केली आहे. तसेच नगरपरिषद प्राथमिक शिक्षक संघ उमरेड यांनी सेवा निवृत्त झालेल्या शिक्षकांच्या वेतन पडताळणी व सेवानिवृत्ती वेतन निश्चितीचे काम स्थानिक निधी लेखा कार्यालया मार्फत होत नाही. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्याबाबत वरील पत्रामध्ये नमूद केले आहे.

त्या संदर्भात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.११-२०२३ दि.१५.१२.२०२३ अन्वये नगरपरिषद / नगरपंचायती मधील स्थानिक कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबी तपासणी / सेवा पुस्तक तपासणी/ वेतन निश्चिती- पडताळणी इत्यादी बाबत करावयाची सविस्तर कार्यपद्धती निश्चित करून देण्यात आलेली आहे.

२. नगर परिषद प्रशासन संचालनालयाच्या दि.२६.०३.२०२५ रोजीच्या स्थायी निदेश क्र.११- शुद्धीपत्रका व्दारे सदरची कार्यवाही पार पाडण्याबाबतचे अधिकार /जबाबदारी निश्चित करून देण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे प्रमाणे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | संवर्ग | संबधित कामकाज पार पाडणारे अधिकारी वर्ग |
|---|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) | वर्ग -३ | विभागीय सह आयुक्त व संबंधित लेखापाल /लेखापरीक्षक , श्रेणी अ |
| २. | जिल्हा सह आयुक्त , जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व ) | वर्ग -४ | जिल्हा सह आयुक्त व संबंधित लेखापाल /लेखापरीक्षक , श्रेणी अ |

३. तरी, नगर परिषद /नगर पंचायत संचालित नगरपरिषद /नगरपंचायत संचलित प्राथमिक शाळेतील कार्यरत /सेवा निवृत्त तसेच शिक्षक/शिक्षकेत्तर आणि वर्ग - ३ / वर्ग -४ कर्मचाऱ्यांचे सेवा विषयक बाबी तपासणी / सेवा पुस्तक तपासणी/ वेतन निश्चिती- पडताळणीची प्राथमिक कार्यवाही वरीलप्रमाणे पार पाडण्यात यावी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रकरणे तातडीने विहित पद्धतीने उप संचालक, शिक्षण विभाग (प्राथमिक ) यांना सादर करावीत.

४. नगर परिषद /नगर पंचायत संचालित नगरपरिषद /नगरपंचायत संचलित प्राथमिक शाळेतील कार्यरत /सेवा निवृत्त तसेच शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतन पडताळणी/ सेवा पुस्तक पडताळणी इत्यादी बाबतची सदरची कार्यवाही शासनाचे पुढील आदेश होई पर्यत तात्पुरती व्यवस्था म्हणून कार्यरत राहील.

सोबत संदर्भ क्र.०१ व ०२ येथील स्थायी निदेश सुलभ संदर्भासाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात आलेले आहेत.

<u>मा. सह आयुक्त (नपप्रसं) यांच्या मान्यतेने,</u>

**Signed by Barindrakumar Chhagan Gavit**
**Date: 23-07-2025 16:47:30**

(बारींद्रकुमार गावित)
**सहायक आयुक्त**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई**

स्थायी निदेश- ११ (शुद्धीपत्रक)

**स्थायी निदेश क्र." २०२३-११ नगरपरिषद / नगरपंचायतीमधील स्थानिक कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी व वेतन निश्चितीची पडताळणी कार्यपद्धती निश्चित करणेबाबत " ---बाबत स्पष्टीकरण व तात्पुरत्या निवृत्तीवेतनाच्या मंजुरीबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत,
क्र.नपप्रसं/स्थायी नि./११/२०२३/न.प.स्था.कर्म./सेवावि.बाबी/वेतन नि.पड. कार्य./कक्ष-१२ /5739
७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१
दिनांक 30 JUL 2025

---

**वाचा क्र.** १.संचालनालयाचे स्थायी निदेश क्र,२०२३-११ . दिनांक १५ डिसेंबर, २०२३.
२.संचालनालयाचे स्थायी निदेश क्र २०२३-११ .चे शुद्धीपत्रक, दिनांक २६ मार्च, २०२५.
३.महाराष्ट्र नागरी सेवा )निवृत्ती वेतन (नियम, १९८२ मधील नियम १२६.

प्रस्तावना-:

वाचा क्र.१ संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.२०२३-११ ,दिनांक १५ डिसेंबर २०२३ व त्याचे शुद्धीपत्रक दिनांक २६ मार्च २०२५ मधील परिशिष्ट-१ नुसार वेतन पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय निवृत्तीवेतन, उपदान व रजा रोखीकरण अदा करण्यात येऊ नये, अशा निर्देशामुळे वेळेवर वेतन पडताळणी न झालेल्या कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, सेवापुस्तक पडताळणी पूर्ण होईपर्यंत नियमानुसार तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करण्याबाबत संचालनालय स्तरावरून निर्देश देण्याची मागणी वेळोवेळी करण्यात येत आहे.

या संदर्भात,वाचा क्र.१, स्थायी निदेश क्र. २०२३-११ दिनांक १५ डिसेंबर २०२३ व त्याचे शुद्धीपत्रक दिर्नाक २६ मार्च २०२५ अन्वये सेवानिवृत्ती नंतर प्राप्त होणारे आर्थिक लाभ उदा . निवृत्तीवेतन, उपदान, रजा रोखीकरण व अंशराशीकरण इत्यादी लाभ प्रदान न करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. परंतु, तात्पुरते निवृत्तिवेतनाबाबत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही.

स्थायी निदेश क्र. २०२३-११ दिनांक १५ डिसेंबर २०२३ व त्याचे शुद्धीपत्रक दिनांक २६ मार्च २०२५ अनुषंगाने सेवानिवृत्ती नंतर प्राप्त होणारे आर्थिक लाभ उदा. निवृत्तीवेतन, उपदान रजा रोखीकरण व अंशराशीकरण इत्यादी प्रदान न करण्याबाबतची बाब आणि महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन (नियम, १९८२) मधील नियम-१२६ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपासून जास्तीत जास्त सहा महिन्यांसाठी तात्पुरते निवृत्तिवेतन म्हणून निर्धारित करण्याची बाब या स्वतंत्र व वेगवेगळ्या आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन (नियम, १९८२) मधील नियम-१२६ नुसार कार्यालय प्रमुखाच्या मते या नियमांमधील तरतुदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन आणि उपदान किंवा दोन्ही अंतिमरीत्या निर्धारित किंवा कायम करण्यापूर्वीच तो कर्मचारी सेवानिवृत्त होण्याची शक्यता असेल, तर तो अधिकारी कार्यालय,अत्यंत काळजीपूर्वक पण संक्षेपाने करता येईल एवढी तपासणी करून शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपासून जास्तीत जास्त सहा महिन्यांसाठी तात्पुरते निवृत्तिवेतन म्हणून निर्धारित केलेले १००% निवृत्तिवेतन प्राधिकृत करेल.

त्यानुसार, महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन (नियम, १९८२) मधील नियम-१२६ नुसार संबंधित कार्यालय प्रमुख यांनी जास्तीत जास्त सहा महिन्यांसाठी तात्पुरते निवृत्तिवेतन नगरपरिषदेच्या स्थानिक कर्मचाऱ्यांना(गट-क व गट-ड) अदा करण्याची कार्यवाही करावी.

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

**प्रति,**

१. विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२. जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).
३. अध्यक्ष / प्रशासक, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
४. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१. मा. प्रधान सचिव ( नवि-२ ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. विभागीय आयुक्त , नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
३.संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४.सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, सर्व विभाग.
५. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई ( सर्व कार्यासन ).
६.निवड नस्ती.